BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)

An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research

Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

मराठवाड्यातील पायाभूत सुविधांचा विकास विशेष संदर्भ सामाजिक पायाभूत सुविधा

सुधीर गौतम भालेराव

संशोधक विद्यार्थी

Email : sudhirb1992@gmail.com

[सारांश : हा संशोधन निबंध मराठवाड्यातील पायाभूत सुविधा मधील सामाजिक पायाभूत सुविधा याविषयी आहे. सामाजिक पायाभूत सुविधामधील शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, रोजगार या सुविधांचा या संशोधन निबंधामध्ये विशेष संदर्भ घेण्यात आला आहे. मराठवाडा हा महाराष्ट्रातील इतर विभागाच्या तुलनेत आजही मागास आहे. या मराठवाड्यातील शैक्षणिक सुविधा, सार्वजनिक पाणीपुरवठा आणि स्वच्छता,रोजगार याविषयी द्वितीयक साधन सामुग्रीच्या आधारे माहितीचे संकलन केले आहे.माहितीचे संकलन करून त्याआधारे निष्कर्षाची मांडणी केली आहे. मराठवाड्यातील शाळामध्ये शिक्षक विद्यार्थी प्रमाण हे राज्याच्या प्रामानापेक्षा चांगले आहे.तसेच स्वच्छतेच्या बाबतीत देखील मराठवाड्यात स्थिती चांगली आहे. पिण्याचा पाण्याचा प्रश्न आजही मराठवाड्यात पूर्णपणे सुटलेला नाही.]

1. प्रस्तावना :

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली .महाराष्ट्र राज्याची निर्मिती होण्यापूर्वी महाराष्ट्र आणि गुजरात यांचे मुंबई द्विभाषिक राज्य होते. मराठवाडा हा स्वतंत्रपूर्व कालखंडात हैद्राबाद संस्थानाचा भाग होता. भारत स्वतंत्र झाल्यानंतर १७ सप्टेबर १९४८ रोजी मराठवाडा स्वतंत्र झाला आणि सार्वभौम भारतामध्ये समाविष्ठ झाला. महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाल्यानंतर १ मे १९६० मध्ये मराठवाडा माराष्ट्र राज्यात सामाविस्थ झाला. मराठवाड्यामध्ये आजघडीला आठ जिल्हे आणि या आठ जिल्ह्यातील ७६ तालुके आहेत. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगर(औरंगाबाद), जालना, बीड, धाराशिव (उस्मानाबाद), लातूर, परभणी, हिंगोली आणि नांदेड हि जिल्हे आहेत.मराठवाडा विभागाला छत्रपती संभाजीनगर विभाग म्हणून ओळखले जाते. या विभागाची राजधानी छत्रपती संभाजीनगर आहे. निजामाच्या कालखंडापासून तत्कालीन औरंगाबाद व आताचे छत्रपती संभाजीनगर शहर नावाजलेले शहर होते. मराठवाड्यातील बीड, लातूर धाराशिव या शहरांना ऐतिहासिक वारसा आहे. मराठवाडा विभाग हा मागास विभाग म्हणून ओळखला जातो कारण या विभागामध्ये पायाभूत सुविधांची कमतरता दिसून येते. आणि त्यामुळे विकासाला बाधा निर्माण होते कारण पायाभूत सुविधा या विकासाच्या उद्दीपक असतात कारण पायाभूत सुविधा म्हणजे काय तर विकासाला आवश्यक संसाधने पुरविणे होय त्यामध्ये रस्ते,वीज, दळणवळणाच्या सोयी, आरोग्याच्या सोयी, रोजगार, स्वच्छता विषयक सुविधा यांची उपलब्धता असणे होय आणि या सुविधा जर उप्लब्ध असतील तर त्या विभागाचा विकास झाला असे म्हटल्या जाते य्त्यामुळे या सुविधा पुरेश्या प्रमाणात उपलब्ध न झाल्यामुळे मराठवाडा हा मागास म्हणून गणला जातो.

भौगोलिकदृष्ट्या मराठवाड्याचा विचार करता या विभागाचे एकूण क्षेत्रफळ ६५ हजार चौ.किमी. आहे त्यामध्ये सर्वाधिक क्षेत्रफळ असणारा जिल्हा बीड आहे त्याचे क्षेत्रफळ १०६९३ चौ.कि.मी. आहे. तर सर्वात कमी क्षेत्रफळ हिंगोली जिल्ह्याचे आहे. ४८२७ चौ.कि.मी. मराठवाडा हा कमी पर्जन्यवृष्टीचा भाग आहे त्यामुळे येथे दर चार पाच वर्षांनी दुष्काळ पडतो मराठवाड्यातील गोदावरी हि मुख्य नदी आहे जी मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, आणि नांदेड या जिल्ह्यातून जाते. मराठवाड्याच्या लोकसंख्येचा विचार करता २०११ च्या जनगणनेनुसार विभागाची एकूण लोकसंख्या

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

१८७३१८७२ एवढी आहे. सर्वाधिक लोकसंख्या असणारा जिल्हा छत्रपती संभाजीनगर ३७ लाख लोकसंख्या असणारा आहे तर सर्वात कमी लोकसंख्या असणारा जिल्हा हिंगोली आहे. विभागाची एकूण साक्षरता ७६ टक्के आहे. मराठवाडा विभागामध्ये एकूण ८५२९ गावे व ७१ शहरे आहेत एकूण गावांपैकी १९८ गावे निर्जन म्हणजे मनुष्यवस्ती नास्णारी आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थाचा विचार करता एकूण ८ जिल्हा परिषद,७६ पंचायत समित्या, ६६७६ ग्रामपंचायती आहेत. तर पाच महानगरपालिका ४९ नगरपरिषदा व १ कटक मंडळ आहे. प्रस्तुत संशोधन निबंध लिहिताना पायाभूत

२.१ पायाभूत सुविधा :

देशाला विकास साधण्यासाठी आवश्यक असणारे सर्वात महत्वाचा घटक म्हणजे पायाभूत सुविधा होय. त्याशिवाय त्या देशाचा विकास झाला म्हणता येणार नाही त्यामुळे पायाभूत सुविधा या विकासाच्या मार्गावरील सर्वात महत्वाचा घटक आहे. पायाभूत सुविधा म्हणजे समाज किंवा उद्योग यांच्या कामकाजासाठी आवश्यक असणरी भौतिक आणि संघटनात्मक रचना होय. तसेच अर्थव्यवस्थेला कार्यक्षम ठेवण्यासाठी तसेच समाजाला देखील कार्यक्षम ठेवण्यासाठी असणारी संघटनात्मक सुविधा यांना सामाजिक पायाभूत सुविधा असे मानले जाते. या पायाभूत सुविधांचे वर्गीकरण दोन भागात केल्या जाते. १) आर्थिक पायाभूत सुविधा २) सामाजिक पायाभूत सुविधा

आर्थिक पायाभूत सुविधांमध्ये अशा पायाभूत सुविधांचा समावेश होतो ज्या आर्थिक क्रियांना गती देतात. उदा. रस्ते, महामार्ग, रेल्वे, वीजपुरवठा,इ. तर सामाजिक पायाभूत सुविधांमध्ये शिक्षण, आरोग्य इ. समावेश होतो. सामाजिक पायाभूत सुविधा मंजे अशा सुविधा ज्यामुळे समाजाचा स्तर उंचावण्यास मदत होते.

प्रस्तुत संशोधनामध्ये सामाजिक पायाभूत सुविधांचा विचार करण्यात आला आहे. त्यामध्ये शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा आणि स्वच्छता,

आपल्या महाराष्ट्र राज्यामध्ये उर्जा, दळणवळण आणि परिवहन क्षेत्रातील प्रगतीमुळे पायाभूत सुविधांचा विकास मोठ्या प्रमाणावर घडून आला आहे. परंतु राज्याच्या तुलनेत मराठवाड्याचा विचार करता आपणास मागासलेपण दिसून येते.मराठवाड्यात असणारे मागासलेपण दूर करण्यासाठी शासन प्रयत्न करते पण ते प्रत्यक्षात इतर विभागाच्या तुलनेत अपुरे आहे. आणि त्यामुळे मराठवाड्यातील पायाभूत सुविधांचा विकास इतर राज्याच्या तुलनेत कमी झाल्याचे दिसते.

२.२ पायाभूत सुविधांचा अर्थ :

पायाभूत सुविधांना सामाजिक आधार संरचना असेही म्हटल्या जाते. तसेच पायाभूत सुविधांसाठी आधारभूत संरचना हि संज्ञा वापरली जाते. संज्ञा कोणतीही असली तरी त्यामागचा अर्थ हाच आहे कारण पायाभूत सुविधांचा विकास झाल्यास आपणास दळणवळण संदेशवहन, शिक्षण उर्जा यासारख्या सुविधा उपलब्ध होताना पर्यायाने आपल्या देशाचा विकास झपाट्याने होण्यास मदत होते.

व्याख्या

1) शेती, उद्योग क्षेत्राला उर्जा पतपुरवठा वाहतूक सेवा विपणन दळणवळण बँका आणि विमा सुविधा अशा अनेक बाबींची आवश्यकता असते. या सर्व सुविधा आणि सेवा यांना एकत्रितपणे आर्थिक आणि सामाजिक परीसेवा किंवा पायाभूत सुविधा असे म्हणतात.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

2) उत्पादन प्रक्रियांना अप्रत्यक्षपणे सहाय्यभूत ठरणाऱ्या विविध स्वरूपातील सामाजिक भांडवलाला आधारभूत संरचना किंवा पायाभूत सुविधा असे म्हणतात.पायाभूत सुविधा प्रत्यक्षपणे वस्तूंचे उत्पादन करीत नाहीत परंतु आर्थिक व्यवहाराची पटली उंचावण्यासाठी परिस्थितीची अनुकुलता ते निर्माण करतात.

3. संशोधनाची गरज :

मराठवाडा हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा प्रशासकीय विभाग आहे.त्यालाच छत्रपती संभाजीनगर विभाग म्हणून ओळखले जाते. या विभागामध्ये एकूण आठ जिल्ह्याचा समावेश होतो महाराष्ट्रातील इतर विभागाच्या तुलनेत मराठवाडा विभाग हा मागास म्हणू परिचित आहे. वारंवार पडणारा दुष्काळ कमी पर्जन्य छायेचा प्रदेश तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हा वगळता इतर जिल्ह्यामध्ये उद्योगधंद्यांची कमतरता तसेच जलसिंचनाच्या अपुऱ्या सोयी यामुळे येथील शेती हि पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने तेथील लोकांचे दरडोई उत्पन्न इतर विभागाच्या तुलनेत कमी आहे.यामुळे विभागामध्ये असणाऱ्या पायाभूत सुविधांचा अभ्यास करणे गरजेचे आहे. या अभ्यासामधून आपणास मराठवाडा विभागातील पायाभूत सुविधांचा विकास किती झाला तसेच पायाभूत सुविधांची स्थिती याची माहिती मिळेल.तसेच पायाभूत सुविधांची आकडेवारी उपलब्ध होईल व त्यानुसार या विभागातील पायाभूत सुविधा किती आहेत तसेच कोणकोणत्या पायाभूत सुविधा आहेत याची माहिती मिळेल.

४. संशोधनाची मर्यादा :

प्रस्तुत संशोधन करता असताना त्यासाठी काही मर्यादा संशोधकाने घातलेल्या आहेत. त्यामध्ये सदरील संशोधनामध्ये २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या दोन वर्षातील सामाजिक पायाभूत सुविधांचा आढावा घेतलेला आहे. तसेच हे संशोधन करत असताना संशोधकाने पायाभूत सुविधांमधील सामाजिक पायाभूत सुविधा आणि या सामाजिक पायाभूत सुविधांमधील शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, रोजगार यांचा आढावा घेतलेला आहे.त्यामुळे हे संशोधन २०२३-२०२४ व २०२४-२०२५ या दोन वर्षामधील सामाजिक पायाभूत सुविधांमधील शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, सामाजिक न्याय, रोजगार आणि दारिद्र्य या पायाभूत सुविधांपुरते मर्यादित आहे.

५. संशोधनाची उद्दिष्टे :

1) मराठवाड्यातील पायाभूत सुविधांच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे

2) मराठवाड्यातील सामाजिक पायाभूत सुविधांचा माहिती घेणे.

3) पायाभूत सुविधांची स्थितीचा अभ्यास करणे

4) मराठवाडा विभागातील पायाभूत सुविधांची मांडणे

६. संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन निबंध लिहिण्यासाठी दुय्यम साधन सामुग्रीचा आधार घेण्य आला आहे. दुय्यम साधनामध्ये शासनाचे विविध अहवाल महाराष्ट्र शासनाच्या सांख्यिकी विभागाच्या विविध अहवालाचा या संशोधनासाठी आधार घेतला आहे. आणि त्यामध्ये मांडण्यात आलेल्या आकडेवारीचा यात समावेश करण्यात आला आहे. व त्या आकडेवारीच्या आधारे निष्कर्षाची मांडणी केलेली आहे.निष्कर्षाची मांडणी करताना उपलब्ध आकडेवारीचा धार घेतला आहे.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

७ माहितीचे विश्लेषण :

मराठवाड्यातील पायाभूत सुविधांचा विकास विशेष संदर्भ सामाजिक पायाभूत सुविधा या संशोधन निबंधाच्या माहितीचे विश्लेषण करताना त्यामध्ये सामाजिक पायाभूत सुविधांमधील शिक्षण, सार्वजनिक आरोग्य, पाणीपुरवठा आणि स्वच्छता, सामाजिक न्याय, रोजगार आणि दारिद्र्य यांचा आढावा घेतलेला आहे.

७.१ शिक्षण क्षेत्र

शिक्षण हा मानवाचा मुलभूत अधिकार आहे.तो अधिकार प्रत्येक नागरिकाला मिळावा म्हणून भारतीय संविधानामध्ये तरतूद केलेली आहे.२००९ च्या शिक्षण हक्क अधिनियामामध्ये ६ ते १४ वर्ष वयोगटातील प्रत्येक मुलाला मोफत आणि सक्तीचे शिक्षण देणे बंधनकारक आहे.शिक्षण हा सामाजिक पायाभूत सुविधांमधील अत्यंत महत्वाचा घटक आहे.

बाब	परिमाण	मराठवाडा विभाग	महाराष्ट्र
प्राथमिक शिक्षण			
एकूण शाळा	संख्या	१६२८०	१०४४९९
विद्यार्थी	हजार	१८९०.०३	१४५०१
शिक्षक	हजार	७७.०६	४९१
प्रती शिक्षक विद्यार्थी प्रमाण	संख्या	२४.५३	३०.००
माध्यमिक शिक्षण			
एकूण शाळा	संख्या	६०७५	२८९८६
विद्यार्थी	हजार	१८६६.५९	६३६२
शिक्षक	हजार	६७.६०	२४६
उच्च शिक्षण			
संस्था	संख्या	७५८	४२८८

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

एकूण विद्यार्थी	हजार	५००.८३	१०४०
तांत्रिक व व्यवसाय शिक्षण			
व्यवसाय शिक्षण पदवी संस्था	संख्या	१३८	१००७
प्रवेश क्षमता	संख्या	१९०००	२१०२६६
व्यवसाय पदविका शिक्षण संस्था	संख्या	६५	१०८२
प्रवेश क्षमता	संख्या	१७१७५	१५४९८७
शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था	संख्या	९२	४१९
प्रवेश क्षमता	संख्या	१८२९४	९३५३३६
अशासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (विनाअनुदानित)	संख्या	७४	५८८
प्रवेश क्षमता	संख्या	९१९६	५९५२४
आदिवासी आश्रमशाळा			
बाब	परिमाण	मराठवाडा विभाग	
शाळा	संख्या	६३	
विद्यार्थी संख्या	हजार	२४.१३५	

(स्त्रोत – दृष्टीक्षेपात छत्रपती संभाजीनगर विभाग महाराष्ट्र, अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन)

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

७.२ सार्वजनिक आरोग्य :

प्रत्येक व्यक्तीच्या आरोग्याची जबाबदारी हि शासनावर असते त्यामुळे आपल्या नागरिकांना आरोग्याच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देणे सरकारचे कर्तव्य असते. मराठवाडा आरोग्य विषयक सुविधांची माहिती वरील तक्त्यामध्ये दिलेली आहे.

बाब	परिमाण	मराठवाडा विभाग	महाराष्ट्र
सार्वजनिक आरोग्य		२०२४-२०२५	डिसेंबर २०२४
रुग्णालये	संख्या	१४०	५१७
दवाखाने	संख्या	८४	८५१
प्राथमिक आरोग्य केंद्र	संख्या	४२२	१९३६
प्राथमिक आरोग्य उपकेंद्र	संख्या	२०६५	१०७६५
प्राथमिक आरोग्य पथके	संख्या	०	१२१
डॉक्टर व वैद्य (सार्वजनिक संस्थामधील)	संख्या	२७९१	

(स्त्रोत – दृष्टीक्षेपात छत्रपती संभाजीनगर विभाग महाराष्ट्र, अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन)

७.३ पाणीपुरवठा आणि स्वच्छता

मानवाला जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारा सर्वात महत्वाचा घटक म्हणजे पाणी आणि त्याला आजार होऊ नये म्हणून आवश्यक असणारी गरज स्वच्छता होय

पिण्याच्या पाण्याचा पुरवठा (२०२३-२४)

बाब	परिमाण	मराठवाडा विभाग
समस्याग्रस्त गावे	संख्या	३८६३

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न पूर्णपणे सुटलेली गावे	संख्या	९२५४

(स्त्रोत – दृष्टीक्षेपात छत्रपती संभाजीनगर विभाग महाराष्ट्र, अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन)

ग्रामीण भागात शौचालयाची सुविधा असलेली कुटुंब

बाब	परिमाण	मराठवाडा विभाग
दारिद्र्य रेषेखालील कुटुंब	संख्या (००)	५५५६
दारिद्र्य रेषेवरील कुटुंब	संख्या (००)	२०३२२

(स्त्रोत – दृष्टीक्षेपात छत्रपती संभाजीनगर विभाग महाराष्ट्र, अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन)

७.४ रोजगार

प्रत्येक व्यक्तीला आपली उपजीविका चालवण्यासाठी रोजगाराची आवश्यकता असते. त्याकरिता प्रत्येक व्यक्तीला किमान रोजगाराची संधी उपलब्ध करून देणे हे सरकारचे कर्तव्य असते त्यानुसार रोजगार हमी योजना सरकारने लागू केली आणि त्यामाध्यमातून प्रत्येक व्यक्तीला किमान रोजगार उपलब्ध करून दिला जातो. या योजनेनुसार मागेल त्याला काम दिला जाते.तसेच आपल्या देशात राज्यात विविध माध्यमातून खाजगी संस्था, शेती, व्यापारी, आणि औद्योगिक क्षेत्रामध्ये रोजगार मिळतो

बाब	परिमाण	मराठवाडा विभाग	महाराष्ट्र
नोंदणीकृत कारखाने	संख्या	२५२६	३९५४१
नोंदणीकृत चालू कारखाने	संख्या	२५२६	३८२५०
त्यातील कामगार	संख्या	१६३०५५	३४७४२६०

मुख्य काम करणारे २०११ प्रमाणे

बाब	परिमाण	मराठवाडा विभाग

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

शेतकरी	संख्या	३०२६७३७
शेतमजूर	संख्या	२६१६८४८
घरगुती उद्योगधंद्यातील	संख्या	१२३३६९
इतर काम करणार	संख्या	१९३३५३२
एकूण मुख्य काम करणार	संख्या	७७००४८६

सीमांतिक काम करणारे २०११ प्रमाणे

शेतकरी	संख्या	१६६६२०
शेतमजूर	संख्या	३४७०७२
घरगुती उद्योगधंद्यातील	संख्या	३०५९२
इतर काम करणारे	संख्या	२२३४४८
एकूण सिमांतिक काम करणारे	संख्या	७६७७३२
मुख्य व सिमांतिक काम करणारे	संख्या	८४६८२१८

(स्त्रोत – दृष्टीक्षेपात छत्रपती संभाजीनगर विभाग महाराष्ट्र, अर्थ व सांख्यिकी संचालनालय नियोजन विभाग महाराष्ट्र शासन)

८ निष्कर्ष :

प्रस्तुत संशोधन निबंधाची माहितीचे विश्लेषण करून पुढील प्रमाणे निष्कर्ष मांडणी केलेली आहे.

1. मराठवाडा विभागाच्या शिक्षण या सामाजिक पायाभूत सुविधेचा विचार करता प्राथमिक शाळांचा विचार करता शिक्षक विद्यार्थी प्रमाण (१:२४.५३) आहे जे महाराष्ट्र राज्याच्या(१:३०) तुलनेत चांगले आहे.याचाच अर्थ मराठवाड्यातील विभागातील शिक्षकांवर राज्याच्या तुलनेत कमी भर आहे.
2. उच्च शिक्षणाचा विचार करता मराठवाडा राज्याच्या तुलनेत मागे असल्याचे दिसुन येते.कारण राज्यातील ४२८८ संस्थांपैकी केवळ ७५८ संस्था विभागात आहेत.

BODHIVRUKSHA JOURNAL OF DIVERSE DISCIPLINE (BJDD)
An Open-Access, Peer-Reviewed, Multidisciplinary Scholarly Journal | Bi-Monthly | Multilingual | Academic Research
Vol 2, Issue 6 (November-December 2026) (Special Issue 2) | ISSN: 3139-1486 (Online) | ISSN: 3139-9819 (Print)

3. तांत्रिक व व्यवसाय शिक्षणाच्या राज्यात २१०२६६ जागा असताना मराठवाडा विभागात केवळ १९००० जागा आहेत म्हणजे तांत्रिक शिक्षणाच्या बाबतीत मराठवाडा राज्याच्या तुलनेत मागे आहे.
4. मराठवाड्यात केवळ १३८ तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या संस्था आहेत तर राज्यात १००७ संस्था आहेत.राज्याच्या तुलनेत हे प्रमाण कमी आहे.
5. सार्वजनिक आरोग्याचा विचार करता मराठवाड्यात राज्याच्या एकूण २७ टक्के रुग्णालये आहेत.तर दवाखान्याचे प्रमाण राज्याच्या एकूण ९.८७ टक्केच आहे. दवाखान्याच्या बाबतीत मराठवाडा मागे आहे.
6. प्राथमिक आरोग्य केंद्र हे राज्यातील एकूण केंद्रापैकी २१.७ टक्के मराठवाड्यात आहे.आणि मराठवाड्यात एकूण सार्वजनिक आरोग्य विभागात २७९१ डॉक्टर आणि वैद्य आहेत.
7. मराठवाडा हा पाणीपुरवठ्याच्या बाबतीत आजही मागास आहे कारण ३८३३ गावे अद्यापही पिण्याच्या पाण्याच्या समस्येने ग्रस्त आहेत त्यांचा आजही कायमस्वरूपी पिण्याचा प्रश्न सुटला नाही.
8. ९२५४ गावात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला असला तरी त्याचे प्रमाण १०० टक्के नाही.
9. ग्रामीण भागातील समाधानकारक चित्र म्हणजे दारिद्र्य रेषेखालील ५५५६०० कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा आहे.तर दारिद्र्य रेषेवरील २०३२२०० कुटुंबाकडे शौचालयाची सुविधा आहे
10. विभागात २५२६ नोंदणीकृत कारखाने आहेत. आणि त्यामाध्यमातून १३६०५५ कामगारांना रोजगार मिळाला आहे.
11. मुख्य आणि सिमांतिक कामगारांचा विचार करता मराठवाड्यातील मोठा वर्ग कृषी वर रोजगारासाठी अवलंबून आहे.मराठवाड्याची अर्थव्यवस्था आजही कृषीवर अवलंबून आहे.

समारोप :

मराठवाडा हा महाराष्ट्रातील मागास विभाग म्हणून परिचित आहे. मराठवाडा हा अवर्षणग्रस्त भाग आहे. मराठवाड्यातील सामाजिक पायाभूत सुविधांचा अभ्यास करून त्याआधारे निष्कर्षाची मांडणी केलेली आहे.

संदर्भ :

1. दृष्टीक्षेपात छत्रपती संभाजीनगर विभाग,अर्थ व सांख्यिकी संचालनालय, नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन सन २०२४-२५